मोटेवार: ... आदेश ... 150

(2)

19



**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

सौ.सरोजिनी जयवंत पोवार
रा.२/३४, बी वॉर्ड, मंगळवार पेठ, साठमारी रोड,
गुरुकृपा स्टेशनर्स जवळ, कोल्हापूर-४१६०१२ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपील क्र.१०७/कोल्हापूर**

अपिलीय प्राधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर शहर — उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा (१)सेक्रेटरी/अध्यक्ष जयविजय को-ऑप.
हौसिंग सोसायटी लि.१०७०, ई वॉर्ड, कोल्हापूर

**अपील क्र.१५०/कोल्हापूर**

अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा निबंधक,
सहकारी संस्था, कोल्हापूर शहर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी तथा** जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०७ + १५० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २२.१०.२००७ |

३. **उपस्थित**

**अपीलकर्ता** सौ.सरोजिनी जयवंत पोवार
रा.२/३४, बी वॉर्ड, मंगळवार पेठ, साठमारी रोड,
गुरुकृपा स्टेशनर्स जवळ, कोल्हापूर-४१६०१२

**अपील क्र.१५०/कोल्हापूर**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर शहर
श्री.अरुण काकडे

**जन माहिती अधिकारी तथा** जिल्हा निबंधक सहकारी संस्था,
जिल्हा कोल्हापूर प्रतिनिधी श्री.अरुण काकडे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ८.८.२००६ व ७.१२.२००५ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १०.१.२००६ (अपील क्र.१५०) |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २४.९.२००६(अपील क्र.१०७)<br>दि.२७.२.२००६(अपील क्र.१५०) |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १३.३.२००६(अपील क्र.१५०) |

८ मूळ अर्जात मागणी केलेली माहिती

**अपील क्र.१०७/कोल्हापूर**

(१) संस्थेने उजळाईवाडी, ता.करवीर येथे खरेदी केलेली रि.स.नं.३० या जागेच्या खरेदीपत्राची, व त्यासोबतच्या कागदपत्रांच्या झेरॉक्स
(२) खरेदीसाठी जमा केलेल्या रकमेचा संपूर्ण तपशील, नाव, पत्ता, तारीख इत्यादी.
(३) श्री.शिवाजी वसंत जाधव यांनी संस्थेकडे जमा केलेल्या सर्व रकमेचा तारखेसहीत तपशील
(४)संस्थेने दि.२८.७.२००२ इ.रोजी घेतलेल्या वार्षिक साधारण सभेची नोटीस व संस्थेने कोणकोणत्या सहकारी खात्याकडे अहवाल दाखल केला त्यांची नावे, दाखल तारीख इ.तसेच अहवालाची झेरॉक्स
(५)१.४.२००२ ते ३१.३.२००६ या कालावधीचे वार्षिक अहवाल वरील क्र.४ प्रमाणे सर्व माहिती.

**अपील क्र.१५०/कोल्हापूर**

(१) संस्थेची घटना व नियमावली (२)फाईलमधील नोंदणीचा अर्ज व संबंधित कागदपत्रांच्या नकला.(३)सुरुवातीपासून ते ३१.३.२००५ अखेरचे ऑडिट मेमोज व संबंधित कागदपत्रे, (४)संस्थेने संमत केलेल्या आजअखेरच्या ठरावाच्या प्रती (५)सदर संस्थेवर आपल्या विभागाने कोठकोठल्या कारवाया केल्या, संस्था सध्या चालू आहे की बंद आहे.

## विवेचन

जयविजय हौसिंग सोसायटी, कोल्हापूर या संस्थेबाबतचे हिशेब तपासणी अहवाल, संस्थेने संमत केलेले संबंधित ठराव, संस्थेने उजळाईवाडी, ता.करवीर येथे रि.स.नं.३० या खरेदी केलेल्या जागेच्या खरेदीपत्राची सत्यप्रत, खरेदीसाठी जमा केलेल्या रकमेचा संपूर्ण तपशील इ. माहिती अपीलकर्ता सौ.सरोजिनी जयवंत पोवार यांनी जन माहिती अधिकारी तथा सेक्रेटरी /अध्यक्ष जयविजय को.ऑप. हौसिंग सोसायटी लि., कोल्हापूर यांचेकडे मागितली होती. त्यांनी हा अर्ज उपनिबंधक सहकारी संस्था, कोल्हापूर यांचे कक्षेत येत असल्याने त्यांचेकडे पाठविला. या संस्थेची नोंदणी रद्द झालेली असल्यामुळे नोंदणी आदेशाव्यतिरिक्त कोणतीही माहिती उपलब्ध नसल्याचे जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था, कोल्हापूर यांनी सौ. पवार यांना कळविले. त्याविरुध्द त्यांनी अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, कोल्हापूर यांचेकडे अपील केले. संस्थेची नोंदणी रद्द केल्यानंतर सहकारी कायद्याप्रमाणे सर्व कागदपत्रे किती दिवस जतन करुन ठेवली जातात व कोणत्या कलमाच्या आधारे नष्ट केले जातात इ. स्पष्टीकरण अपेक्षित असल्याचे त्यांनी या अपिलात नमूद केले. तथापी विरळणी संदर्भातील कायद्यातील सूचनेप्रमाणे आदेशा-व्यतिरिक्तची कागदपत्रे 'ड' वर्गवारीत नोंदणी केल्याने ती नष्ट करण्यात आल्याचा जन माहिती अधिकारी यांचा खुलासा मान्य करुन अपिलीय प्राधिकाऱ्यांनी हे अपील फेटाळले. त्याविरुध्द सौ.पवार यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे. (अपील क्र.१०७ )

सौ.पवार यांनी जन माहिती अधिकारी म्हणून सचीव / अध्यक्ष जयविजय सहकारी हौसिंग सोसायटी यांचेकडे माहिती मागितली. 'संस्थेने अशा प्रकारचा पदाधिकारी नेमलेला नाही, संस्थेशी आपला संबंध नाही व संस्थेला शासनाचे किंवा निमशासकीय सहाय्य व मिळत नाही व आपण संस्थेचे सभासद नाही. तसेच संस्थेची नोंदणी जिल्हा निबंधक सहकारी संस्था यांनी रद्द केलेली आहे त्यामुळे रद्द केलेल्या संस्थेला त्रास देण्याच्या हेतूने आपण अर्ज केला आहे,' असे नमूद करुन संस्थेने ही माहिती नाकारली. त्याविरुध्द सौ.पवार यांनी उपनिबंधक सहकारी संस्था, कोल्हापूर शहर यांचेकडे अपील केले. या संस्थेला हा कायदा लागू होत नसल्याचे नमूद करुन उपनिबंधक सहकारी संस्था, कोल्हापूर शहर यांनी त्यांचे अपील फेटाळले. त्याविरुध्द सौ पवार यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे. (अपील क्र.१५०)

नोंदणी रद्द झाली असल्यामुळे माहिती देता आली नाही, असे जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था यांनी सांगितले असले तरी या संदर्भात सौ.पवार यांनी केलेल्या तक्रारीची दखल घेऊन राज्य माहिती आयोगाने उपनिबंधक सहकारी संस्था, कोल्हापूर शहर यांचेकडे दि.५.१०.२००७ रोजी विचारणा केल्यानंतर त्यांनी दि.५.१०.२००७ रोजी अध्यक्ष/ सचीव जयविजय हौसिंग सोसायटी यांना, तसेच कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या शाखेला या संस्थेचे खाते चालू / बंद असलेबाबत माहिती पाठविण्यास कळविले. 'हे खाते चालू असल्याचे बँकेकडून कळल्यावर दि.१०.१०.२००७ रोजी वरील खात्यावरील व्यवहार थांबविणेबाबत उपनिबंधक सहकारी संस्था यांनी बँकेला कळविले. दरम्यानच्या काळात संस्थेने विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांचेकडे संस्थेच्या पुनरुज्जीवनासाठी दाखल केलेले अपील मंजूर करण्यात आले. त्यामुळे या संस्थेचे अस्तित्व पुन्हा निर्माण झालेले आहे, त्यामुळे सौ.पवार यांनी मागणी केलेली माहिती देण्याच्या सूचना दि.५.१०.२००७ च्या पत्राने संस्थेला देण्यात आल्या आहेत,' असे उपनिबंधक सहकारी संस्था यांनी आयोगाला सादर केलेल्या निवेदनात नमूद केले आहे.

संस्थेच्या कारभारात भ्रष्टाचार झाला असून सहकार खात्यातील अधिकारी व संस्थाप्रमुख यांच्या संगनमतामुळे माहिती दिली जात नाही, असे सौ.पवार यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलात म्हटले आहे.

ही संस्था सन १९८८ साली स्थापन झाली होती व दि.३०.७.१९९६ रोजी तिची नोंदणी रद्द करण्यात आली. ती रद्द होऊन दहा वर्षांचा कालावधी उलटला आहे. त्यामुळे 'अ' वर्गवारीप्रमाणे उपलब्ध असलेली कागदपत्रे दिली व 'ड' वर्गवारीमधील कागदपत्रे नष्ट केल्यामुळे देण्यात आली नाहीत. माहिती न देण्याचा कोणताही उद्देश नव्हता, असे जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांनी आयोगापुढील सुनावणीत सांगितले.

सहकारी गृहनिर्माण संस्थांना केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू होतो किंवा नाही, या मुद्याबाबत मतभेद आहेत. तत्कालीन सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या दि.८.२.२००६ च्या परिपत्रकाचा हवाला देऊन सहकारी गृहनिर्माण संस्था हा कायदा आपल्याला लागू नसल्याचे प्रतिपादन करीत आल्या आहेत. मात्र अशा संस्थेची भूमिका कोणतीही असली तरी त्यांचे नियंत्रण सहकार कायद्यानुसार सहकार निबंधकांच्या व्दारे होत असल्यामुळे उपनिबंधक सहकारी संस्था कार्यालयाने माहिती देणे आवश्यक आहे . आपल्याला ही माहिती मुद्दाम न मिळाल्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांना शास्ती लावावी, अशी मागणी सौ.पवार यांनी केली आहे परंतु सन १९९६ साली संस्थेची नोंदणी रद्द झाली, त्यानंतर 'ड' वर्गवारीतील कागदपत्रे नष्ट करण्यात आली आणि दि.३१.५.२००७ च्या आदेशाने संस्थेचे अस्तित्व पुन्हा निर्माण झाले. ही परिस्थिती लक्षात घेता विलंबाचा मुद्दा विचारात घेता येणार नाही. मात्र आता संस्थेचे पुनरुज्जीवन झालेले असल्यामुळे अपीलकर्त्याला हवी असलेली सर्व माहिती दिली जाणे आवश्यक आहे. संस्थेची नोंदणी १९९६ ला रद्द झाल्यानंतरही बँकेतील संस्थेचे खाते चालू होते असे उपनिबंधक सहकारी संस्था, कोल्हापूर शहर यांनी सादर केलेल्या निवेदनावरुन स्पष्ट होते. या स्थितीत तर अपीलकर्त्याच्या माहितीच्या मागणीचा मुद्दा अधिक महत्त्वाचा ठरतो.

वरील सर्व परिस्थिती व सादर करण्यात आलेली कागदपत्रे यांचा विचार करुन आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य.

(२) दोन्ही अपिलांमध्ये अपीलकर्त्याने मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था, कोल्हापूर शहर यांनी संस्थेकडून घेऊन अपीलकर्त्याला सुनावणीच्या दिवसापासून १५ दिवसात द्यावी किंवा थेट संस्थेकडून ही माहिती पुरविण्याची व्यवस्था करावी. याची जबाबदारी अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, कोल्हापूर यांची राहील, असे आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिले होते. त्याच्या पूर्ततेचा अहवाल दि.२५.१०.२००७ पर्यंत जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगाला सादर करावा.

(३) अपीलकर्त्याने मागितलेली संस्थेच्या आर्थिक व्यवहाराची / हिशेब तपासणीची माहिती कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती बँक, लक्ष्मीपुरी शाखेतील संस्थेच्या खात्यावरील आर्थिक व्यवहाराच्या साक्षांकित प्रतीसह वरील मुदतीत जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकर्त्याला पुरवावी.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे**

**पुणे**
**दि. १२.११.२००७**

aamcomp

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.रावसाहेब गणपतराव पवार
रा.४-१६, पराग बंगला, यशवंत कृषि सहकारी सहभागीदारी
गृहनिर्माण संस्था मर्यादित (खेड) संगमनगर, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक , सहकारी संस्था,
ता.सातारा, जि. सातारा — उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष व सचीव, यशवंत कृषि सहकारी सहभागीदारी
गृहनिर्माण संस्था मर्यादित (खेड), संगमनगर, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११८ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१.७.२००६ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.रावसाहेब गणपतराव पवार
रा.४-१६, पराग बंगला, यशवंत कृषि सहकारी सहभागीदारी
गृहनिर्माण संस्था मर्यादित (खेड), संगमनगर, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक , सहकारी संस्था,
ता.सातारा, जि. सातारा

**जन माहिती अधिकारी** तथा अध्यक्ष व सचीव, यशवंत कृषि सहकारी सहभागीदारी
गृहनिर्माण संस्था मर्यादित (खेड), संगमनगर, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१.७.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २३.७.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १९.९.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ४.१०.२००६ |
| ८ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती<br><br>यशवंत कृषि सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित (खेड), संगमनगर, सातारा या संस्थेच्या संदर्भातील तपासणी अहवाल, वार्षिक ताळेबद व नफातोटा पत्रक, इंजिन दुरुस्तीसाठी झालेला खर्च इ. स्वरुपाच्या २७ मुद्याची माहिती. | |

## विवेचन

यशवंत कृषि सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित (खेड), संगमनगर, सातारा या संस्थेच्या संदर्भातील तपासणी अहवाल, वार्षिक ताळेबंद व नफातोटा पत्रक, इंजिन दुरुस्तीसाठी झालेला खर्च इ. स्वरुपाच्या २७ मुद्यांची माहिती मागणारा अर्ज अपीलकर्ता श्री.रावसाहेब गणपतराव पवार यांनी संस्थेच्या सचिवांकडे केला होता. यशवंत कृषि सहकारी गृहनिर्माण संस्थेला केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू होत नाही, असे नमूद करुन संस्थेची भूमिका स्पष्ट करणारे उत्तर अध्यक्ष श्री.दशरथ पांडुरंग इंगवले यांनी श्री.पवार यांना पाठविले. त्याविरुध्द श्री.पवार यांनी अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक , सहकारी संस्था, ता.सातारा, जि. सातारा यांचेकडे अपील केले. जमीन अथवा अन्य कोणत्याही स्वरुपात शासकीय सहाय्य न मिळणाऱ्या संस्थेला हा कायदा लागू होत नसल्याचे अपिलीय प्राधिकारी श्री.जे.डी.पाटील यांनी मान्य केले. मात्र महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनमय १९६० प्रमाणे संस्थेच्या सभासदास संस्थेच्या कागदपत्रांच्या प्रती मिळण्याचा हक्क, तसेच सहकारी गृहनिर्माण संस्थेचे कामकाज सहकारी कायदाकानून व पोटनियमाप्रमाणे चालावे व सभासदांच्या हिताचे रक्षण व्हावे म्हणून केंद्रिय माहितीचा अधिकार २००५ अन्वये या सदराखाली येणारी माहिती संस्थेने देणे इष्ट होईल, असे त्यांनी निकालपत्रात नमूद केले. मुद्दा क्र.२५ मधील माहिती आपल्या कार्यालयाकडून देण्याचा व मुद्दा क्र.२० ची माहिती महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ३२(२) अन्वये सभासद म्हणून मागणी करुन

घेण्याचा आदेश दिला. हा आदेश चुकीचा असून आपल्याला माहिती मिळाली नाही, असे नमूद करुन श्री.पवार यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री.पवार (वय वर्षे ८३), श्री.धोंडिराम शामराव ठेंबरे (वय वर्षे ६८), श्री.आनंदराव नारायण खामकर(वय वर्षे ६७) यांनी आपण वयोवृध्द असल्यामुळे लौकर सुनावणी घ्यावी, अशी विनंती आयोगाला केली होती. त्यानुसार घेण्यात आलेल्या सुनावणीत वरील तिघांसह संस्थेचे पदाधिकारी व संस्थेच्या वतीने ॲड डी.एच.पवार उपस्थित होते. संस्थेला शासनाची जमीन व शासनाचे कर्ज मिळाले असल्याचा श्री.पवार यांचा दावा खोटा असल्याचे संस्थेचे सचीव व वकील यांनी स्पष्ट केले. त्यामुळे केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ आपल्या संस्थेला लागू होत नाही, असे प्रतिपादन त्यांनी केले. तरीही अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, फलटण (अतिरिक्त पदभार, सातारा) यांच्या आदेशानुसार आवश्यक तेवढी माहिती श्री.पवार यांना दिली आहे, असे त्यांनी नमूद केले, मात्र आवश्यक ती माहिती आपल्याला दिली जात नाही, असे श्री.पवार यांनी सांगितले.

संस्थांतर्गत वादातून विविध पातळ्यांवर केले जाणारे अर्ज, तक्रारी व दावे याचाच हा अर्ज हा एक भाग आहे, असे सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसते. श्री.पवार सन १९६८ ते १९८० पर्यंत उपरोक्त गृहनिर्माण संस्थेचे अध्यक्ष व श्री.खामकर हे सचीव होते. त्यांची सत्ता गेल्यापासून संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना अशा विविध मार्गाने ते त्रास देतात, असे संस्थेचे अध्यक्ष व सचीव यांनी आयोगाला सादर केलेल्या लेखी निवेदनात म्हटले आहे. परंतु आपण संस्थेच्या हितासाठीच झगडत असल्याचे प्रतिपादन श्री.पवार व श्री.खामकर यांनी केले.

श्री.पवार यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.२० व २५ वगळता सर्व मुद्दे खुलासा विचारणारे अथवा सूचना किंवा आरोप करणारे अशा स्वरुपाचे आहेत, हे तत्कालीन अपिलीय प्राधिकारी श्री.जे.डी.पाटील यांनी नमूद केले आहे, ते रास्त आहे. तरीही उभय बाजूंना एकत्र आणून आवश्यक तेवढी माहिती दिली जावी व सातत्याने होत असलेले अर्ज, दावे यांचे प्रमाण कमी व्हावे असे आपले प्रयत्न असल्याचे अपिलीय प्राधिकारी श्री.कैलास प्रभाकर जेबले यांनी आयोगापुढील सुनावणीत सांगितले. तत्कालीन अपिलीय प्राधिकारी श्री.जे.डी.पाटील व विद्यमान अपिलीय प्राधिकारी श्री.कैलास प्रभाकर जेबले यांची माहिती देण्याबाबतची सकारात्मक भूमिका उल्लेखनीय आहे, याची

आयोग आवर्जून नोंद घेत आहे. यशवंत कृषि सहकारी गृहनिर्माण संस्थेला केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू होतो किंवा नाही हा मुद्दा प्रलंबित ठेऊन उभय बाजूंची एकत्रित बैठक घेऊन माहितीच्या पारदर्शकतेबाबत प्रयत्न करावा, असा आदेश आयोगाने श्री.जेबले यांना सुनावणीच्या दिवशीच दिला होता. उभय बाजूंच्या प्रतिनिधींची बैठक घेऊन अशा प्रकारचा प्रयत्न केल्याचा अहवाल श्री.जेबले यांनी दि.१७.८.२००७ रोजी पाठविला. अहवाल आयोगाला दि.५.९.२००७ रोजी प्राप्त झाला आहे. २७ मुद्यांबाबत संस्थेने दिलेली माहिती व खुलासा यासोबत आहे, मात्र आपल्याला पूर्ण माहिती मिळालेली नाही, असे निवेदन श्री.पवार यांनी आयोगाला दि.३.९.२००७ रोजी(प्राप्त दि.५.९.२००७) सादर केले आहे. उभय बाजूंमधील वादविवादाच्या पार्श्वभूमीवर माहितीच्या अधिकाराचा होत असलेला अवलंब लक्षात घेता केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत याहून अधिक दखल घेण्याची आवश्यकता आयोगाला वाटत नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे

पुणे
दि. १५.११.२००७

आवक ०१ ③ आपील क्र १३७ दि. १२-११-०६ रोजी

20



**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.दिलीप अशोक देसाई
रा.ए-२२, सरगम विहार अपार्टमेंट, नागाळा पार्क,
जि.प.समोर, जि. कोल्हापूर ४१६ ००३ — अपीलकर्ता

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार पन्हाळा,
ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

जनमाहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, पन्हाळा,
ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३७ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२२.१०.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.दिलीप अशोक देसाई
रा.ए-२२, सरगम विहार अपार्टमेंट, नागाळा पार्क,
जि.प.समोर, जि. कोल्हापूर ४१६ ००३

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार पन्हाळा,
ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर श्री.श्रीरंग तांबे

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, पन्हाळा,
ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर श्री.टी.ए.भोसले

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ७.१.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ५.१.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १८.२.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २०.४.२००६ |
| ८ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती<br><br>ग्रामीण पन्हाळा भूमापन क्रमांक/गट क्रमांक १३१ संबंधी<br>(१) जमीन कोणाच्या मालकीची व वहिवाटीची आहे, त्याचा ७/१२ उतारा मिळावा.<br>(२) सदर जमिनीचा डायरी उतारा क्र.११५३ व २०५ चा प्रमाणित खरी नक्कल<br>(३) ग.नं.१३१ च्या ७/१२ उतारा नोंदीमध्ये १९७५ पासून २००५ अखेर फेरफार नोंदीसंबंधीची नोटीस प्रत. | |

## विवेचन

ग्रामीण पन्हाळा भूमापन क्रमांक / गट क्रमांक १३१ ही जमीन कोणाच्या मालकीची व वहिवाटीची आहे, त्याचा ७/१२ चा उतारा, डायरी उतारा क्र.११५३ व २०५ याची प्रमणित नक्कल, फेरफार नोंदीसंदर्भातील नोटिसीच्या प्रमाणित नकला अशी सन १९७५ ते २००५ अखेरपर्यंतची माहिती अपीलकर्ता श्री.दिलीप अशोक देसाई यांनी जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, पन्हाळा यांचेकडे मागितली होती. ती न मिळाल्यामुळे श्री.देसाई यांनी अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार यांचेकडे अपील केले. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी ते फेटाळले. त्याविरुध्द श्री.देसाई यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे. अधिकाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करावी व अपीलकर्त्याला आर्थिक व मानसिक त्रासाबद्दल भरपाई मिळावी, अशी त्यांची मागणी आहे.

आपल्या मामाच्या जमिनीवर नगरपालिकेचे एक तत्कालीन पदाधिकारी श्री.रघुनाथ शंकर तोरसे यांचे वहिवाटदार म्हणून नाव बेकायदेशीरपणे लावले गेले. दि.४.१.२००६ रोजी आपण घेतलेल्या ७/१२ उताऱ्यात हे नाव नव्हते. तत्कालीन अधिकारी व कर्मचारी यांच्या संगनमताने ते लावण्यात आले. त्याविरुध्द आपल्या मामानी गेली १०-१२ वर्षे न्यायालयीन लढा चालू ठेवला आहे. मागितलेल्या कागदपत्रातून बेकायदेशीर नोंदी न्यायालयात स्पष्ट होतील व शासकीय कारभारातील

भ्रष्टाचार उघड होईल, तो होऊ नये म्हणून माहिती नाकारली जात आहे, असे प्रतिपादन श्री.दिलीप अशोक देसाई यांनी आयोगापुढील सुनावणीत केले.

'गट क्र.१३१ चा कोणत्या सालातील ७/१२ हवा आहे हे समजून येत नाही. तसेच गट क्र.१३१ व ११५३ चा फेरफार उतारा इकडील कार्यालयात उपलब्ध नाही. त्याचप्रमाणे गट क्र.१३१ वर फेरफार क्र.२०५ व ११५३ बाबतच्या नोटीस आढळून येत नाहीत. त्यामुळे सदरची माहिती देता येत नाही. आपण मागणी केलेल्या माहितीपैकी फेरफार क्र.२०५ चा प्रमाणित उतारा सोबत जोडला असून फेरफार क्र.११५३ चा प्रमाणित फेरफार उतारा व त्याबाबतच्या नोटिसांची प्रमाणित नक्कल शासकीय माहिती अधिकारी तथा मंडल अधिकारी, पन्हाळा यांचेकडून घ्यावी,' असे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार श्री.सतीश कदम यांनी विहित मुदतीत कळविले. मात्र नंतर रु.७०.३० शुल्क भरुन माहिती घेऊन जाण्याबाबत कळविले असतानाही श्री.देसाई यांनी माहिती नेली नाही म्हणून ते रजिस्टर टपालाने पाठविले, परंतु ते टपाल परत आले, असे श्री.सतीश कदम यांनी आयोगाला सादर केलेल्या लेखी निवेदनात म्हटले आहे. तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार श्री.समीर शिंगटे यांनी पन्हाळा येथील गट क्र.१३१ संबंधी 'या कार्यालयातील प्राप्त माहिती सोबत देणेत येत असून ' असे नमूद करुन श्री.देसाई यांचे अपील फेटाळले. प्रत्यक्षात कोणतीही माहिती दिली गेली नव्हती, असे श्री.देसाई यांनी सांगितले.

तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, पन्हाळा, श्री.समीर शिंगटे यांची बारामतीला, तर तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार श्री.सतीश कदम यांची चिपळूण येथे बदली झाली आहे. तहसीलदार, पन्हाळा या पदाची सूत्रे आपण दि.२५.४.२००६ रोजी स्वीकारल्यानंतर देऊ केलेली माहिती श्री.देसाई यांनी स्वीकारली नाही, असे अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, पन्हाळा श्री.श्रीरंग तांबे यांनी नमूद केले. आपण टपाल नाकारले नाही, परंतु ते परत गेले आहे, हे खरे आहे, असे श्री.देसाई यांनी सांगितले.

७/१२ च्या उताऱ्याला बेकायदेशीरपणे अन्य व्यक्तीचे नाव लावणे हा या विषयातील मुख्य मुद्दा आहे व हे नाव रद्द करुन मूळ नोंदी प्रमाणेच उताऱ्यातील नावे कायम रहावी, ही श्री.देसाई यांची मुख्य मागणी आहे. आपण या विषयाची फेरसुनावणी करुन वहिवाटदार म्हणून लावले गेलेले

तांबे यांनी सांगितले. तशा प्रकारच्या दुरुस्त नोंदीच्या उताऱ्यासह सर्व कागदपत्रे त्यांनी आयोगाला सादर केली व अपीलकर्त्यालाही सुनावणीच्या वेळीच पुरविली. आता आपली कोणतीही तक्रार राहिलेली नाही, असे श्री.देसाई यांनी स्पष्ट केले.

श्री.देसाई यांना आवश्यक असलेल्या ७/१२ च्या उताऱ्यावर बेकायदेशीरपणे अन्य व्यक्तीच्या नावाची नोंद केली आहे, हे त्यांचे म्हणणे रास्त असल्याचे श्री.तांबे यांनी सादर केलेल्या दुरुस्त उताऱ्यावरुन स्पष्ट होते. अचूक माहिती ही होती. मात्र अन्य व्यक्तीचे नांव ७/१२ उताऱ्याला लावण्यात अधिकारी व कर्मचारी यांच्या संगनमताने भ्रष्टाचार झाला आहे का, हा मुद्दा केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कक्षेतील नाही. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.कदम यांनी आधी माहिती नाकारणे अन्याय्य होते. परंतु तो निर्णय बदलून त्यांनी आवश्यक माहिती पाठविण्याचा प्रयत्न केला, असे सादर करण्यात आलेल्या निवेदनावरुन व कागदपत्रांवरुन दिसते. अपीलकर्त्याने शुल्क भरुन स्वतः ही माहिती घेणे आवश्यक होते. तसेच रजिस्टर्ड टपाल स्वीकारले जाण्याची दक्षता घ्यावयास हवी होती. कागदपत्रात उपलब्ध असलेली माहिती देऊ केली होती, हे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार श्री.कदम व तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, पन्हाळा श्री.समीर शिंगटे यांचे स्पष्टीकरण रास्त असले तरी मूळ नोंदीनुसार शहानिशा करुन अचूक व संपूर्ण माहिती देण्याचा प्रयत्न त्यांनी करणे अधिक उचित ठरले असते.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये योग्य माहितीसाठी पाठपुरावा केला, म्हणून माहितीची अचूकता प्रशासनाने प्रस्थापित केली, या अपीलकर्त्याच्या प्रतिपादनाची विशेषत्वाने नोंद घेण्यात येत आहे.

आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

**आदेश**

(१) अपीलकर्त्याची तक्रार राहिलेली नसल्यामुळे अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे**

**पुणे**
**दि. १२.११.२००७**

आपील क्र. १४० दि. ५-११-०८ रोजी आदेश निर्गमित केले



18

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग ) यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. राजू लक्ष्मण पाच्छापुरे,
जुना चंदूर रोड, तनंगे मळा, दुर्गामाता चौक,
उत्तम टॉकीज मागे, इचलकरंजी,
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

अपीलकर्ता

विरुध्द

उत्तरवादी

अपिलीय प्राधिकारी तथा
सह आयुक्त, अन्न आणि औषधे प्रशासन,
न्यू लकी बिल्डिंग, गुरुवार पेठ, ७९१/९३,
महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ०४२

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,
अन्न आणि औषधे प्रशासन,
न्यू लकी बिल्डिंग, गुरुवार पेठ, ७९१/९३,
महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ०४२

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २३.१०.२००७ |
| ३ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २.३.२००६ |
| ४ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २८.३.२००६ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १७.४.२००६ |
| ६ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १५.५.२००६ |

मागणी केलेली माहिती

गुटख्यामधील मॅग्नेशियम कार्बोनेट या पावडरीच्या बाबतीत, तसेच अन्न भेसळ प्रतिबंधक नियम १९५५ चे कलम ३२ (एक) व (२) प्रमाणे भेसळयुक्त व शरीरास अपायकारक असणाऱ्या गुटखा व पानमसाले व इतर उत्पादने यांच्यावर कोणती कारवाई होते त्याबाबत माहिती

## विवेचन

अपीलकर्ता श्री. राजू लक्ष्मण पाच्छापुरे यांनी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, अन्न आणि औषधे प्रशासन, महाराष्ट्र राज्य, रघुकुल, ८५२/८, बी वॉर्ड, सुभाष रोड, मु. पो. कोल्हापूर, जि. कोल्हापूर यांचेकडून गुटख्यामधील मॅग्नेशियम कार्बोनेट या पावडरीच्या बाबतीत, तसेच भेसळयुक्त व शरीराला अपायकारक असणाऱ्या गुटखा व पानमसाले यांच्या उत्पादकावर कोणती कारवाई होते, त्याबाबतची माहिती मागितली होती. ती न मिळाल्यामुळे त्यांनी अपिलीय प्राधिकारी तथा सह आयुक्त, अन्न आणि औषधे प्रशासन, महाराष्ट्र राज्य, रघुकुल, ८५२/८, बी वॉर्ड, सुभाष रोड, मु. पो. कोल्हापूर, जि. कोल्हापूर यांचेकडे अपील केले. माहिती न दिली गेल्यामुळे किंवा मिळालेल्या माहितीने समाधान न झाल्यामुळे श्री. पाच्छापुरे यांनी राज्य माहिती आयोगाकडे दि. २६.५.२००६ रोजी द्वितीय अपील दाखल केले होते. श्री. पाच्छापुरे यांच्या अपिलाच्या अनुषंगाने दि. २३.१०.२००७ रोजी कोल्हापूर येथे सुनावणी निश्चित करण्यात आली होती. दरम्यान संबंधित प्रकरणी अपेक्षित असलेली माहिती श्री. पाच्छापुरे यांना प्राप्त झालेली असल्याने सदर अपील निकाली काढण्यास हरकत नाही, असे त्यांनी आयोगास दि. १३.१०.२००७ च्या लेखी निवेदनाद्वारे (प्राप्त दि.१५.१०.२००७) कळविले आहे. तसेच सह आयुक्त, (पुणे विभाग), अन्न आणि औषधे प्रशासन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना कळविले आहे. त्यांना संपूर्ण माहिती देण्यात आल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा सह आयुक्त, अन्न आणि औषधे

प्रशासन यांनीही आयोगाला सादर केलेल्या लेखी निवेदनात नमूद केले आहे. अपीलकर्त्यास माहिती मिळालेली असल्याने व तसे लेखी निवेदन दिले असल्याने अपील काढून टाकण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे आहे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे विभाग, पुणे**

**पुणे**
**दि. ५.११.२००७**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, ( पुणे विभाग ) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. तुषार देविदास झेंडे
मु.पो.म्हसोबाचीवाडी ता.इंदापूर, — अपीलकर्ता
जिल्हा पुणे

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा
गट विकास अधिकारी (वर्ग-१)
पंचायत समिती, इंदापूर, — उत्तरवादी
ता. इंदापूर, जि. पुणे

जन माहिती अधिकारी तथा
गट शिक्षणाधिकारी,
पंचायत समिती, इंदापूर,
ता. इंदापूर, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५३ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३०.६.२००७ |

**३ उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. तुषार देविदास झेंडे, मु.पो.म्हसोबाचीवाडी, ता.इंदापूर, जिल्हा पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा गट विकास अधिकारी (वर्ग-१), पंचायत समिती, इंदापूर, ता. इंदापूर, जि. पुणे श्री. डी. ए. वानखेडे

**जन माहिती अधिकारी** तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, इंदापूर, ता. इंदापूर, जि. पुणे श्री. पी. एस. काळे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३.३.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १.४.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २०.४.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

८ मूळ अर्जात मागणी केलेली माहिती

मौजे म्हसोबाचीवाडी, ता. इंदापूर, जि. पुणे येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेसाठीच्या जिल्हा परिषदेच्या मालकीच्या एकूण खोल्या, प्रत्येक खोली बांधलेले वर्ष, त्यांचा प्रत्येकी खर्च याचा सविस्तर तपशील. सर्व खोल्यांमध्ये बालवाडी ते इ. ७ वी पर्यंतचे वर्ग बसून किती खोल्या शिल्लक राहतात, शिल्लक/ मोकळया खोल्यांचा वापर होतो काय, तसेच इतर खात्याने बांधलेल्या खोल्या शाळा वापरत असेल तर त्याचा तपशील

## विवेचन

मौजे म्हसोबाचीवाडी, ता. इंदापूर, जि. पुणे येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या खोल्यांमधील जिल्हा परिषदेच्या मालकीच्या खोल्यांची संख्या, त्या बांधल्याचे वर्ष व खर्च इत्यादी माहिती अपीलकर्ता श्री. तुषार देविदास झेंडे यांनी जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, इंदापूर यांच्याकडे मागितली होती. त्यांनी एका पानाची माहिती देण्यासाठी ६०/- रुपये शुल्क आकारले म्हणून श्री. झेंडे यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांना 'अपिलीय प्राधिकारी' संबोधून अपील केले. परंतु गट विकास अधिकारी हे तालुका स्तरावरील अपिलीय प्राधिकारी असल्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी हा अर्ज त्यांच्याकडे अपिलासाठी वर्ग केला. तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी श्री. राजाराम दिघे यांनी हा विषय चेष्टेवारी घेतला व निर्णय दिला नाही, असे नमूद करुन श्री. झेंडे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्यांनी श्री. झेंडे यांनी मागितलेली माहिती विहित मुदतीत दिली आहे. परंतु 'या उत्तरात नमूद केलेल्या व प्रत्यक्षात वापरात असलेल्या खोल्या यात तफावत आहे. दोन खोल्या वापरात नसताना ग्रामपंचायतीला भाडे दिले जात होते. आपण माहिती मागितल्यावर त्या दोन खोल्या सोडल्या,' असे श्री. झेंडे यांनी आयोगापुढील सुनावणीत सांगितले. या दोन खोल्या शाळेपासून एक - दीड

किलोमीटर अंतरावर आहेत. शाळेला एकूण आठ खोल्या आवश्यक असल्यामुळे तेव्हा त्या वापरल्या जात होत्या, आता त्या वापरल्या जात नाहीत, असे जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, इंदापूर श्री. पी. एस. काळे यांनी स्पष्ट केले.

जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित मुदतीत माहिती दिली असली तरी एका पानाच्या माहितीसाठी आकारलेले ६०/- रुपये हे शुल्क अवाजवी आहे, हे श्री. झेंडे यांचे म्हणणे रास्त आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील अंशतः मान्य.

२. एका पानासाठी आकारलेले रुपये ६०/- शुल्क हे अवाजवी असून जन माहिती अधिकाऱ्यांनी ते त्वरित अपीलकर्त्यास परत करावे व खोल्यांच्या वापराबाबतची तत्कालीन परिस्थितीची माहिती अपीलकर्त्यास निःशुल्क व त्वरित द्यावी, असा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला होता. त्याचा पूर्तता अहवाल जन माहिती अधिकाऱ्यांनी दि. ३०.११.२००७ पर्यंत आयोगाला सादर करावा.

३. तत्कालीन अपिलीय प्राधिकारी श्री. राजाराम दिघे यांनी अपिलाची दखल गंभीरपणे न घेतल्याबद्दल व अपिलाचा निकाल न दिल्याबद्दल त्यांना समज देण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे

**पुणे**
**दि. १९.११.२००७**

प्रत : माहितीसाठी

१. श्री. राजाराम दिघे, तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, इंदापूर जि. पुणे सध्या अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जलस्वराज प्रकल्प, महाराष्ट्र राज्य, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. चंद्रशेखर बाबुराव मुळे,
द्वारा शाहीम शेख, ११२१-अ, गावभाग,
सिध्दार्थ परिसर, सांगली, जि. सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर विभाग,कोल्हापूर — उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा उप प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन,
शासकीय विश्रामधाम जवळ, विश्रामबाग, सांगली-४१६४१५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५७ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १३.७.२००७ |

३ उपस्थित

**अपीलकर्ता** श्री. चंद्रशेखर बाबुराव मुळे, द्वारा शाहीम शेख, ११२१-अ, गावभाग, सिध्दार्थ परिसर, सांगली, जि. सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक अधिकारी,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर विभाग,कोल्हापूर श्री. विजय ल. कोर्डे

**जन माहिती अधिकारी** तथा उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, शासकीय विश्रामधाम जवळ, विश्रामबाग, सांगली-४१६४१५ श्री. गु. शि. फुलारी

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १२.१.२००६ |

| | | |
|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १८.३.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ६.२.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

८ मूळ अर्जात मागणी केलेली माहिती

सह्याद्री स्टार्च, मिरज एम.आय.डी.सी. या कारखान्यातून होणाऱ्या जल आणि वायू प्रदूषणाची १९९५ पासूनची माहिती

## विवेचन

सह्याद्री स्टार्च या कारखान्यातून बाहेर पडणाऱ्या दूषित पाण्याच्या निचऱ्यासाठी बसविलेली यंत्रणा, प्रदूषण नियंत्रण मंडळाने त्यांना काढलेल्या नोटिसा, सन १९९५ पासून २००६ पर्यंतचा दूषित पाणी तपासणीचा अहवाल या बाबतची माहिती अपीलकर्ता श्री. चंद्रशेखर बाबुराव मुळे यांनी जन माहिती अधिकारी तथा उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सांगली यांच्याकडे मागितली होती. तसेच या कंपनीच्या संदर्भातील कागदपत्रे पाहणीसाठी तारीख व वेळ मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी एक आठवड्यात त्यांना पत्र पाठवून या कारखान्याशी सर्व संबंधित नस्ती पाहणीसाठी व ती पाहून आवश्यक असलेली माहिती घेण्यासाठी पत्र पाठविले. मात्र आपण पाठविलेली कागदपत्रे आधी मिळावीत, असे श्री. मुळे यांनी कळविले. त्यानुसार जन माहिती अधिकाऱ्यांनी त्यांना माहिती दिली. आपल्याला मिळालेली माहिती अपूर्ण व विसंगत असल्याच्या कारणावरुन श्री. मुळे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर यांच्याकडे अपील केले. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी जन माहिती अधिकाऱ्यांचा निर्णय योग्य ठरवून अपील निकाली काढले. त्याविरुध्द श्री. मुळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

'अपिलाची सुनावणी न झाल्यामुळे जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी निश्चिंत राहतात, आणि मला मात्र घटनेने दिलेल्या अधिकारापासून वंचित रहावे लागत आहे,' असे आयोगाकडे पाठविलेल्या निवेदनात नमूद करणारे अपीलकर्ता श्री. चंद्रशेखर बाबुराव मुळे हे

आयोगापुढील सुनावणीला उपस्थित नव्हते. उपलब्ध कागदपत्र पाहता त्यांनी मागितलेली माहिती जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेली आहे, असे दिसते. सबब हे अपील निकाली काढण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे**

**पुणे**
**दि. २२.११.२००७**

**राज्य माहित्ती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

---

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.गणपत गोकुळ मुळूक
मु.पो.आखरवाडी (चास), ता.राजगुरुनगर, जि.पुणे अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती,
राजगुरुनगर, ता.राजगुरुनगर, जि.पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत आखरवाडी(चास),
ता.राजगुरुनगर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५७ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | १२.७.२००७ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.गणपत गोकुळ मुळूक
मु.पो.आखरवाडी (चास), ता.राजगुरुनगर, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती,
राजगुरुनगर, ता.राजगुरुनगर, जि.पुणे
श्री.के.बी.नेहेरे

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत आखरवाडी(चास),
ता.राजगुरुनगर, जि.पुणे
श्रीमती के.डी.कोतवाल

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १९.५.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १८.७.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

आखरवाडी, ता.खेड, जि.पुणे येथील ग्रामपंचायतीला सन २००२ ते २००३ या काळात यशवंत ग्राम समृध्दी योजना व अन्य विकास योजनांच्यासाठी मिळालेले अनुदान, लोकवर्गणी, ग्रामसभेतील ठराव, झालेला खर्च.

## विवेचन

आखरवाडी, ता.खेड, जि.पुणे येथील ग्रामपंचायतीला सन २००२ ते २००३ या काळात यशवंत ग्राम समृध्दी योजना व अन्य विकास योजनांच्या साठी मिळालेले अनुदान, लोकवर्गणी, झालेला खर्च, ग्रामसभेतील ठराव इ. माहिती अपीलकर्ता श्री.गणपत गोकुळ मुळूक यांनी जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक यांच्याकडे मागितली होती. माहिती व्यक्तिश: स्वीकारणार असल्याचे श्री.मुळूक यांनी अर्जात नमूद केले होते. रु.५५७/- शुल्क भरुन माहिती घेऊन जावी, असे जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कळविले. परंतु आपण आर्थिकदृष्ट्या दुर्बल असून रक्कम व शुल्क याबाबत कलमामध्ये तरतूद आहे, याविरुध्द आपण अपिलीय अधिकाऱ्यांकडे दाद मागणार आहोत असे नमूद करुन श्री.मुळूक यांनी शुल्क भरले नाही. श्री.मुळूक दारिद्र्यरेषेखालील नसल्यामुळे शुल्क भरणे आवश्यक असल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी यांच्यापुढे स्पष्ट करण्यात आल्यानंतर त्यांनी शुल्क भरले. मात्र अपूर्ण माहिती मिळाली व प्रमाणापेक्षा जास्त रक्कम आकारली, या कारणावरुन श्री.मुळूक यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले आहे.

श्री.मुळूक हे आखरवाडी येथे सरपंच होते. त्यांनी मागितलेली माहिती त्यांच्या सरपंच-पदाच्या काळातीलच आहे. आवश्यक ती माहिती त्यांना वेळोवेळी देण्यात आलेली आहे, असे अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी श्री.के.बी.नेहेरे यांनी आयोगापुढील सुनावणीत सांगितले. आपल्याला ग्रामपंचायतीत चांगली वागणूक दिली जात नाही व आपल्या नावावर खोट्या सह्या करुन पैसे काढण्यात आलेले आहेत, म्हणून आपण हिशेबाची मागणी करीत आहोत, असे प्रतिपादन श्री.मुळूक यांनी केले. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक श्री.के.डी.कोतवाल व अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी श्री.के.बी.नेहेरे यांनी त्यांच्या आरोपाचा इन्कार केला व कोणतीही कागदपत्रे कार्यालयात येऊन त्यांनी पाहावीत त्यातील आवश्यक असलेली माहिती त्यांना दिली जाईल, असे त्यांनी नमूद केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अमान्य.

(२) आवश्यकतेप्रमाणे अपीलकर्त्याने ग्रामपंचायत व पंचायत समिती कार्यालयात जाऊन अभिलेखाचे निरीक्षण करावे व नियमानुसार योग्य ते शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन घ्यावी, असे आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिले होते. त्याच्या पूर्ततेचा अहवाल जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी दि.५.१२.२००७ पर्यंत आयोगाला सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे

पुणे
दि. १७.११.२००७

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. रवींद्र जीवन नगरकर,
द्वारा शाहीन शेख,
११२७-अ, गांवभाग, सिध्दार्थ परिसर,
सांगली - ४१६ ४१६

अपीलकर्ता

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा
अप्पर जिल्हाधिकारी, सांगली
जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली

उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
मिरज उपविभाग, मिरज जि. सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५८ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १३.७.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. रवींद्र जीवन नगरकर, द्वारा शाहीन शेख,
११२७-अ, गांवभाग, सिध्दार्थ परिसर, सांगली - ४१६ ४१६

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर जिल्हाधिकारी, सांगली
जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली श्री. विश्वजीत माने

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १६.२.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १४.३.२००६ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ७.४.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १७.५.२००६ |

८ मूळ अर्जात मागणी केलेली माहिती

सन २००३ ते २००५ अखेर बिगरशेती शर्तीचा भंग झालेले मिरज तालुक्यातील भूखंडाची माहिती

## विवेचन

दि. १.१.२००३ ते ३१.३.२००५ या कालावधीत बिगरशेती आदेशातील शर्तींचा भंग झाल्याची मिरज तालुक्यातील भूखंडांची गाववार संख्या, त्यावर केलेली कारवाई, बिगरशेती शर्तीचा भंग झाल्यास कारवाईबद्दलची कार्यपध्दती अशी माहिती अपीलकर्ता श्री. रवींद्र जीवन नगरकर यांनी जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, मिरज उपविभाग, मिरज, जि. सांगली यांच्याकडे मागितली होती. वस्तुतः जन माहिती अधिकारी म्हणून अर्ज निवासी नायब तहसीलदार, मिरज यांच्याकडे करावयास हवा होता. उपविभागीय अधिकारी, मिरज उपविभाग, मिरज यांना तो त्यांच्याकडे पाठविता आला असता, परंतु त्यांनी तसे न करता तहसील कार्यालयाकडून माहिती मागविली. तहसीलदार, मिरज यांनी माहितीची व्यापकता लक्षात घेता १५ दिवस मुदतवाढ मागितली. त्यांनी पाठविलेली माहिती उपविभागीय अधिकाऱ्यांनी श्री. नगरकर यांना पाठविली. परंतु माहिती न मिळाल्याचे नमूद करुन श्री. नगरकर यांनी अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी, सांगली यांच्याकडे अपील केले. त्यांनी अपील अमान्य केले, त्याविरुध्द श्री. नगरकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

'अपिलाची सुनावणी न झाल्यामुळे जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी निचित राहतात, व घटनेने दिलेल्या अधिकारापासून मला वंचित रहावे लागत आहे,' असे श्री. नगरकर यांनी आयोगाला पाठविलेल्या निवेदनात नमूद केले आहे. मात्र आयोगापुढील सुनावणीला ते उपस्थित नव्हते, तसेच त्यांनी लेखी निवेदनही पाठविले नाही. तहसीलदार, मिरज यांनी संकलित करुन उपविभागीय अधिकारी कार्यालयाकडे पाठविलेली माहिती श्री. नगरकर यांना त्वरित पाठविण्यात

आली आहे. एवढेच नव्हे, तर आणखी माहिती हवी असल्यास संपर्क साधण्याबाबत कळविण्यात आले आहे, असे अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी सांगली श्री. विश्वजीत माने यांनी सांगितले. त्यासाठी पूरक कागदपत्रे त्यांनी सादर केली. मूळ अर्जानुसार जर काही माहिती द्यावयाची राहिली असेल तर ती त्वरित व निःशुल्क द्यावी, असा आदेश सुनावणीच्या वेळीच आयोगाने दिला. त्यानुसार दि. २०.७.२००७ रोजी माहिती मिळाल्याची अपीलकर्त्याची पोहच असलेले पत्र उपविभागीय अधिकारी, मिरज उपविभाग, मिरज यांनी दि. ३.८.२००७ रोजी आयोगाला सादर केले आहे.

केवळ जन माहिती अधिकाऱ्यांकडे अर्ज पाठविण्याची तांत्रिक पूर्तता करण्याऐवजी तत्कालीन उपविभागीय अधिकारी, मिरज उपविभाग, मिरज श्री. त्रिभुवन कुलकर्णी यांनी पाठपुरावा करुन माहिती मिळवून देण्याचा प्रयत्न केला हे प्रसंशनीय आहे, त्याची आयोग आर्वजून नोंद घेत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे**

**पुणे**
**दि. १९.११.२००७**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. बाबुराव हरीभाऊ जाधव,
श्रीहरी निवास, रामनगर (प), कोल्हापूर रोड,
सांगली, जि. सांगली-४१६ ३१६

अपीलकर्ता

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, मिरज, जि. सांगली

उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा
ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत बामणोली,
ता. मिरज, जि. सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५९ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १३.७.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. बाबुराव हरीभाऊ जाधव, श्रीहरी निवास, रामनगर (प), कोल्हापूर रोड, सांगली, जि. सांगली-४१६ ३१६

**अपिलीय प्राधिकारी** तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मिरज, जि. सांगली
डॉ. मिलिंद प्रभाकरराव पोहरे

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत बामणोली, ता. मिरज, जि. सांगली श्री. शिवाजी गणपती माने

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१.२.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २४.४.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

८. मूळ अर्जात मागणी केलेली माहिती

मौजे बामणोली, ता. मिरज, जि. सांगली ग्रामपंचायतीला विकास कामासाठी सालवार मिळालेले अनुदान कोणत्या कामासाठी, किती, त्यावर झालेला खर्च, मूल्यांकनाची छायांकित प्रत, मूल्यांकनाशिवाय झालेला खर्च, अखर्चित रक्कम, लेखा परीक्षण अहवालाची छायांकित प्रत व दि. २४.११.१९९८ रोजी झालेल्या ग्रामसभेचे इतिवृत्त

## विवेचन

मौजे बामणोली, ता. मिरज, जि. सांगली ग्रामपंचायतीला विकास कामासाठी सालवार मिळालेले अनुदान कोणत्या कामासाठी, किती, त्यावर झालेला खर्च, मूल्यांकनाची छायांकित प्रत, मुल्यांकनाशिवाय झालेला खर्च, अखर्चित रक्कम, लेखा परीक्षण अहवालाची छायांकित प्रत व दि. २४.११.१९९८ रोजी झालेल्या ग्रामसभेचे इतिवृत्त अशी माहिती अपीलकर्ता श्री. बाबुराव हरीभाऊ जाधव यांनी जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, बामणोली यांच्याकडे मागितली होती. त्यांनी माहिती न दिल्यामुळे श्री. जाधव यांनी अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी, मिरज यांच्याकडे अपील केले. त्याची दखल न घेतल्याच्या कारणावरून श्री. जाधव यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री. जाधव हे बामणोली ग्रामपंचायतीचे दि. १.१.१९९६ ते नोव्हेंबर १९९८ अखेर ग्रामविकास अधिकारी होते. त्यांच्याकडून रूपये ३,४४,३२५.२५ येणे वसुली असल्याचा अहवाल विद्यमान ग्रामविकास अधिकारी श्री. शिवाजी गणपती माने यांनी दिला व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांनी श्री. जाधव यांच्यावर भ्रष्टाचाराचा आरोप ठेवला आहे. आपल्यावर खोटा आरोप ठेवला असून आपण कोणतीही रक्कम देणे लागत नाही, असे श्री. जाधव यांचे म्हणणे आहे व त्या संदर्भात कामगार न्यायालय, सांगली येथे त्यांनी दावा दाखल केला आहे. या दाव्यात सादर करण्यासाठी आपल्याला ही माहिती हवी असल्याचे श्री. जाधव यांनी नमूद केले आहे. श्री. जाधव यांनी माहिती मागणीच्या अर्जात 'खालील कालावधीत' असे नमूद केले असले तरी कालावधी दिलेला

नाही. प्रथम अपिलामध्ये त्यांनी वित्तीयवर्ष सन १९९९ ते डिसेंबर २००६ अखेर असा कालावधी नमूद केला आहे. तसेच योजनांचा तपशील दिला आहे. याबरोबरच मूल्यांकनाच्या अनुषंगाने बँक खात्याच्या पासबुकाची नक्कल, अखर्चित रक्कम खर्च न होण्याचे कारण व त्याला जबाबदार असणाऱ्यांची माहिती, बामणोली ग्रामपंचायतीची १९९८ मधील निवडणूकीच्या वेळची मतदार यादीची नक्कल अशी मूळ अर्जात नसलेली अतिरिक्त माहिती मागितली आहे.

जन माहिती अधिकाऱ्यांनी काही माहिती मोफत दिली व 'सध्या हिशेब तपासणी चालू असल्यामुळे ऑडिट नोट देता आली नाही, पूर्ण झाल्यानंतर ती देत आहे,' असे अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी यांना कळवून त्याची प्रत श्री. जाधव यांना पाठविली. श्री. जाधव यांनी कामगार न्यायालयात दाखल केलेल्या दाव्यामध्ये संबंधित कागदपत्रे दि. ३.१.२००६ रोजी दाखल केलेली आहेत, त्यामुळे देता येत नाहीत, असे ग्रामविकास अधिकारी श्री. माने यांनी कळविले. मूळ अर्जाच्या तारखेपासून तीन महिन्यांनी जन माहिती अधिकाऱ्यांनी आपल्याला शुल्क मागणी करणारे पत्र पाठविले. दरम्यानच्या काळात आपण अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी यांच्याकडे अपील केले होते. त्यामुळे आपण शुल्क भरले नाही, असे श्री. जाधव यांनी सांगितले. आपण अपिलाची सुनावणी घेतली नाही, पण ग्रामविकास अधिकाऱ्यांना माहिती देण्याबाबत सूचना दिली, त्याची प्रत श्री. जाधव यांना पाठविली गेली नाही, असे अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी यांनी नमूद केले. केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुकताच अस्तित्वात आला होता, त्यामुळे त्याच्या कार्यपध्दतीबाबतची संपूर्ण माहिती नसल्यामुळे ही चूक झाली, असे अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी डॉ. मिलिंद प्रभाकरराव पोहरे यांनी सांगितले. उपलब्ध कागदपत्रे श्री. जाधव यांना दिली. ऑडिट नोट दि. २५.७.२००७ रोजी झाली. ती समक्ष देण्यासाठी गेलो असता, ती श्री. जाधव यांनी स्वीकारली नाही, असे श्री. माने यांनी लेखी व तोंडी नमूद केले. मात्र आपल्याला अपुरी व विसंगत माहिती दिली जात आहे, असे प्रतिपादन श्री. जाधव यांनी केले.

श्री. जाधव यांनी मूळ अर्जात मागितलेल्या माहितीपेक्षा प्रथम व द्वितीय अपिलामध्ये अधिक माहिती मागितली आहे. मूळ अर्जातील माहितीच्या मागणीचा विस्तारित व अनुषंगिक तपशील असे प्रामुख्याने त्याचे स्वरुप असले तरी अशा प्रकारे अतिरिक्त मागणी अपिलात करणे योग्य नाही. मूळ अर्जात त्याबाबत स्पष्टता असणे आवश्यक आहे.

कामगार न्यायालयात दाखल केलेल्या दाव्यात कागदपत्रे सादर केली असली तरी जन माहिती अधिकाऱ्यांनी न्यायालयाकडून संबंधित कागदपत्रांच्या प्रती उपलब्ध करुन त्याही श्री. जाधव यांना देणे शक्य होते. तसे प्रयत्न जन माहिती अधिकारी अथवा अपिलीय प्राधिकारी यांच्या पातळीवर केले गेले नाहीत. जन माहिती अधिकाऱ्यांनी माहितीच्या मूळ अर्जाची दखल अधिक तत्परतेने घेणे आवश्यक होते, तशी ती त्यांनी घेतलेली नाही. मात्र एकूण दिलेली माहिती निःशुल्क दिली आहे.

उभय बाजूंची निवेदने, सादर केलेली कागदपत्रे यांचा विचार करुन आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

**आदेश**

१. अपील मान्य.

२. अपीलकर्त्यास उर्वरित माहिती सात दिवसात निःशुल्क द्यावी, असा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिलेला होता व त्याची जबाबदारी अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी श्री. पोहरे यांच्यावर सोपविली होती. याबाबतचा पूर्तता अहवाल पाठविणेची जबाबदारी तत्कालीन गट विकास अधिकारी श्री. पोहरे व सध्या कार्यरत असलेले गट विकास अधिकारी श्री. आर.बी. जोशी यांची राहील. या कार्यवाहीचा पूर्तता अहवाल त्यांनी दि. ५.१२.२००७ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे**

**पुणे**
**दि. २०.११.२००७**

प्रत माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी

१. डॉ. मिलिंद प्रभाकरराव पोहरे, तत्कालीन गट विकास अधिकारी, पंचायत समिती मिरज, ता.मिरज, जि. सांगली

२. श्री. आर. बी. जोशी, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मिरज, ता.मिरज, जि. सांगली

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. दत्ताजी विलासराव टिपुगडे
७०५, 'ए' वॉर्ड, सरनाईक कॉलनी, कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा आयुक्त,
कोल्हापूर महानगरपालिका, जि. कोल्हापूर

उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा
१. उप शहर अभियंता, कोल्हापूर महानगरपालिका, जि. कोल्हापूर
२. जल अभियंता, शहर पाणी पुरवठा विभाग,
कोल्हापूर महानगरपालिका, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६० / कोल्हापूर |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ४.१०.२००६ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख<br>१. उप शहर अभियंता, कोल्हापूर महानगरपालिका<br>२. जल अभियंता, शहर पाणी पुरवठा विभाग, कोल्हापूर महानगरपालिका, | <br>दि. ६.१२.२००६<br>दि. २३.४.२००६ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३.११.२००६ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १७.५.२००६ |

६ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

कोल्हापूर शहर सि.स.नं. ७०५, 'ए' वॉर्ड मध्ये किती फ्लॅटधारकांनी संडास बांधून ड्रेनेजला जोडण्यात आले. तसेच बिगर परवानगीचे संडास बांधून सेप्टीक टँकला जोडण्यात आले व सेप्टीक टँकने किती जागा घेतली आहे इत्यादीबाबतची माहिती

## विवेचन

अपीलकर्ता श्री. दत्ताजी विलासराव टिपुगडे यांनी जन माहिती अधिकारी तथा (१) उप शहर अभियंता, कोल्हापूर महानगरपालिका व (२) जल अभियंता, शहर पाणी पुरवठा विभाग, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर यांचेकडून कोल्हापूर शहर सि.स.नं. ७०५ 'ए' वॉर्ड किती फ्लॅटधारकांनी परवानगीने वा बिगर परवानगीने संडास बांधून घेतले याबाबतची माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तराविरुध्द श्री. टिपुगडे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, जि. कोल्हापूर यांच्याकडे अपील केले. त्यांच्या निर्णयाने अपीलकर्त्याचे समाधान न झाल्याने श्री. टिपुगडे यांनी राज्य माहिती आयोगाकडे दि. १५.६.२००७ रोजी अपील केले होते. अपिलांबाबत विचारणा करणाऱ्या आयोगाच्या पत्रास अनुसरुन श्री. टिपुगडे यांनी दि. ६.११.२००७ रोजी लेखी निवेदनाद्वारे (प्राप्त दि. १२.११.२००७) अपेक्षित माहिती प्राप्त झाली असलेबद्दल कळविले आहे. तसेच याबाबत शहर अभियंता, कोल्हापूर महानगरपालिका, जल अभियंता, शहर पाणी पुरवठा विभाग, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर व अपिलीय प्राधिकारी आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, जि. कोल्हापूर यांनाही लेखी कळविले असल्याचे आयोगाला सादर केलेल्या लेखी निवेदनात नमूद केले आहे. ह्या बाबी विचारात घेता अपीलकर्त्यास अपेक्षित माहिती मिळालेली असल्याने व तसे लेखी निवेदन त्यांनी दिलेले असल्याने अपीलकर्त्याची आता काही तक्रार राहिलेली नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे

पुणे
दि. ३०.११.२००७